POSTEL REGD NO. AKOLA DN./285/2025-2027

साप्ताहिक

स्थापना : जुन २००८

# पिंगलाक्षी एक्सप्रेस



मुख्य संपादक : गजानन बानोरे 9420100590, 9075407343 R.N.I. No. MAHMAR/2008/24720

• रिसोड जि.वाशीम • वर्ष १८ • अंक ३० • मंगळवार, दि. १६ ते २३ डिसेंबर २०२५ • पृष्ठे ४ • किंमत १ रु.

# आत्मा वाशिम अंतर्गत आंतरराज्य शेतकरी अभ्यास दौऱ्यास हिरवा झेंडा

## आधुनिक कृषी तंत्रज्ञान व उद्यमशीलतेचा अनुभव घेण्यासाठी शेतकरी रवाना

**वाशिम, दि. १५ डिसेंबर (जिमाका) कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा) अंतर्गत आयोजित आंतरराज्य शेतकरी अभ्यास दौऱ्यास जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून रवाना करण्यात आले. यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी सहभागी शेतकऱ्यांशी संवाद साधत अभ्यास दौऱ्याच्या माध्यमातून आधुनिक कृषी तंत्रज्ञान, मूल्यवर्धन व बाजारपेठेच्या संधी समजून घेण्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले तसेच आनंदी व सुरक्षित प्रवासासाठी शुभेच्छा दिल्या.**



याप्रसंगी प्रकल्प संचालक आत्मा अनिसा महाबळे, प्रकल्प उपसंचालक आत्मा वाशिम अजय मोरे, सीएम फेलो संकेत नरुटे, संबंधित अधिकारी तसेच सहभागी शेतकरी उपस्थित होते. हा आंतरराज्य शेतकरी अभ्यास दौरा प्रकल्प संचालक आत्मा वाशिम यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला असून शेतकरी उत्पादक कंपनी व शेतकरी गटांतील उत्पादक व उद्यमी अशा एकूण २० शेतकरी या दौऱ्यात सहभागी झाले आहेत.

दि. १५ ते २० डिसेंबर २०२५ या कालावधीत या अभ्यास दौऱ्यांतर्गत वाशिम येथून नांदेड येथील कापूस संशोधन केंद्र, श्री इन्स्टिट्यूट ऑफ एग्रीकल्चर सायन्स अँड टेक्नॉलॉजी, बेंगलोर, नॅचरल फार्मिंग सेंटर, बेंगलोर, न्यूट्री प्लॅनेट, बेंगलोर, सफल मार्केट, आय.आय.एच.आर. हिसरगट्टा (बेंगलोर), डाळिंब संशोधन केंद्र, सोलापूर तसेच कोरडवाहू पिके संशोधन केंद्र, सोलापूर येथे भेटी देण्यात येणार आहेत. या अभ्यास




दौऱ्यामध्ये प्रक्रिया उद्योग, मार्केटिंग, पॅकेजिंग, मूल्यवर्धन तसेच न्यूट्री बार निर्मिती यासारख्या विषयांवर विशेष भर देण्यात आला असून शेतकऱ्यांना आधुनिक कृषी तंत्रज्ञानाचा प्रत्यक्ष अनुभव तसेच कृषी उद्यमशीलतेच्या नव्या संधींबाबत सखोल माहिती मिळणार आहे. या अभ्यास दौऱ्याच्या यशस्वी आयोजनासाठी तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक जयप्रकाश लव्हाळे तसेच कार्यालय सहाय्यक संदीप मोरे यांनी विशेष परिश्रम घेतले.

# लोक न्यायालयात एकाच दिवशी ६७० प्रकरणे निकाली

वाशिम,दि.१४ डिसेंबर (जिमाका) राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, नवी दिल्ली व महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या निर्देशानुसार शनिवार, दिनांक १३ डिसेंबर २०२५ रोजी वाशिम जिल्ह्यातील सर्व तालुका न्यायालये तसेच जिल्हा न्यायालयात राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले होते. या राष्ट्रीय लोक अदालतीचे उद्घाटन मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाचे पालक न्यायमूर्ती व वाशिम जिल्ह्याचे पालक न्यायमूर्ती एम. एम. नेरलीकर यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी पालक न्यायमूर्ती एम. एम. नेरलीकर यांनी न्यायालयात प्रलंबित तसेच दाखलपूर्व प्रकरणांतील पक्षकारांनी आपले वाद सामोपचाराने व कायमस्वरूपी मिटविण्यासाठी लोक न्यायालयात सहभागी व्हावे, असे आवाहन केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तसेच अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, वाशिम अनिल सुब्रमण्यम यांनी केले. त्यांनी जास्तीत जास्त प्रकरणे राष्ट्रीय लोक अदालतीत निकाली काढण्याचे आवाहन उपस्थितांना केले. यावेळी अध्यक्ष, जिल्हा विधीज्ञ मंडळ वाशिम अनुप




बाकलीवाल यांनीही लोक अदालतीच्या माध्यमातून अधिकाधिक प्रकरणे निकाली काढण्याचे महत्त्व अधोरेखित केले.

या राष्ट्रीय लोक अदालतीत वाशिम जिल्ह्यातील न्यायालयांमध्ये प्रलंबित असलेली एकूण ४,६४७ प्रकरणे तसेच दाखलपूर्व ९,११५ प्रकरणे अशा एकूण प्रकरणांपैकी प्रलंबित व दाखलपूर्व अशी मिळून ६७० प्रकरणे एकाच दिवशी सामोपचाराने निकाली काढण्यात आली. या प्रकरणांमधून एकूण रुपये ३,८७,८८,४१२/- (रुपये तीन कोटी सत्याऐंशी लाख अठ्ठ्याऐंशी हजार चारशे बारा) इतक्या रकमेचा निपटारा करण्यात आला. राष्ट्रीय लोक अदालतीच्या यशस्वी आयोजनासाठी जिल्ह्यातील वकील संघ तसेच जिल्हा पोलीस दलाचे मोलाचे सहकार्य लाभले, असे आयोजकांनी नमूद केले.

# अल्प खर्चित शेतीपूरक तंत्रज्ञान व उद्योजकतेवरील एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन

वाशिम, दि. १५ डिसेंबर (जिमाका): कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा), कृषी विभाग व महात्मा गांधी ग्रामीण औद्योगीकरण संस्थान (चऋ्च्खठ), वर्धा यांच्या संयुक्त विद्यमाने अल्प खर्चित शेतीपूरक तंत्रज्ञान, उद्योजकता, रोजगार निर्मिती, जैव-प्रक्रिया आणि हर्बल उत्पादने या विषयांवर एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. ही कार्यशाळा मंगळवार, दि. २३ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ९:३० वाजता स्व. बाळासाहेब ठाकरे प्रशिक्षण भवन, काटा रोड, वाशिम येथे होणार आहे.

या कार्यशाळेत चऋ्च्खठ, वर्धा येथे विकसित करण्यात आलेल्या विविध उपयुक्त व नावीन्यपूर्ण तंत्रज्ञानांची सविस्तर माहिती देण्यात येणार आहे. या तंत्रज्ञानांच्या आधारे शेतीपूरक उद्योजकता कशी विकसित करावी, रोजगार निर्मितीच्या संधी कशा साधाव्यात, तसेच जैव-प्रक्रिया व हर्बल उत्पादने क्षेत्रातील वाढत्या संधींबाबत तज्ज्ञांकडून मार्गदर्शन व प्रशिक्षण दिले जाणार आहे. कार्यशाळेचा लाभ शेतकरी उत्पादक संस्था (ऋझज) सदस्य, बचत गट (डकॠ) सदस्य, लघुउद्योजक, कृषी सखी/कृषी ताई, गोपालक/जैविक निविष्ठा संसाधन केंद्र (इठउ) धारक, फार्म लॅब धारक, तसेच बेरोजगार कृषी युवक-युवती आणि सर्व शेतकरी बंधू-भगिनींनी घ्यावा, असे आवाहन प्रकल्प संचालक, आत्मा वाशिम अनिसा महाबळे यांनी केले आहे. या कार्यशाळेमुळे ग्रामीण भागातील नागरिकांना कमी खर्चात आधुनिक शेतीपूरक तंत्रज्ञान आत्मसात करून स्वयंरोजगाराच्या संधी निर्माण करण्यास आणि आत्मनिर्भर होण्यास निश्चितच मदत होणार आहे.

# सामान्य ग्राहकांना प्रीपेड मीटर नाहीत; स्मार्ट मीटरमुळे वीजबिलात लाभ - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

नागपूर, दि. १४ :- राज्यात स्मार्ट मीटर बसवण्याचा निर्णय केंद्र शासनाच्या योजनेंतर्गत घेण्यात आला आहे.सामान्य घरगुती ग्राहकांना प्रीपेड मीटर लावले जाणार नाहीत, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत सांगितले. प्रश्नोत्तराच्या तासात विधानसभा सदस्य भास्कर जाधव आणि रईस शेख यांच्या प्रश्नाला उत्तर देताना मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, सुरुवातीला प्रत्येक ग्राहकाला प्रीपेड स्मार्ट मीटर लावण्याचा प्रस्ताव होता. मात्र, त्यावर मोठ्या प्रमाणात आक्षेप नोंदवण्यात आल्याने राज्य शासनाने टप्प्याटप्प्याने अंमलबजावणीचा निर्णय घेतला. पहिल्या टप्प्यात फिडर मीटर आणि डिस्ट्रीब्युशन मीटर बसवण्यात आले असून, सध्या शासकीय कार्यालये व आस्थापनांमध्येच प्रीपेड स्मार्ट मीटर बसविण्यात आले आहेत. सामान्य ग्राहकांसाठी मात्र पोस्टपेड स्मार्ट मीटरच बसवले जात आहेत. स्मार्ट मीटर स्वीकारणाऱ्या ग्राहकांच्या



वीजबिलात १० टक्के सवलत देण्यात आली असल्याने आतापर्यंत स्मार्ट मीटरमुळे नागरिकांना प्रत्यक्ष लाभ झाला आहे. स्मार्ट मीटरमुळे ग्राहकांना मोबाईल ॲपच्या माध्यमातून तासागणिक वीज वापराचा तपशील मिळतो, त्यामुळे वापराची पडताळणी करणे सोपे झाले आहे. याशिवाय २४ तास तक्रार निवारण व्यवस्था उपलब्ध असून, आतापर्यंत पाच वेगवेगळ्या कंपन्यांनी बसवलेल्या स्मार्ट मीटरमध्ये केवळ एक टक्क्यांपेक्षा कमी त्रुटी आढळल्या आहेत. पुढील पाच वर्षे स्मार्ट मीटर पोस्टपेड स्वरूपातच राहणार असून, प्रीपेड मीटर सक्तीचा कोणताही निर्णय झालेला नाही. विधानसभा सदस्यांनी मांडलेल्या सूचनांचा विचार केला जाईल, असे आश्वासनही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी दिले.

# सद्दी एआय स्मार्ट कॅलेंडरची

आजच्या वेगवान जगात वेळेचे व्यवस्थापन अत्यंत महत्त्वाचे बनले आहे. कॅलेंडर हे वेळेचे नियोजन करण्याचे मुख्य साधन आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता, मशीन लर्निंग, बिग डेटा ॲनॅलिसिस, रोबोटिक्स आदींमुळे संबंधित संगणकीय प्रणाली आणि यंत्रणा स्वयंभू बनत आहेत. कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्र वेगाने विकसित होत असल्याचा कॅलेंडर आणि वेळ व्यवस्थापनावर मोठा परिणाम होत आहे. यामुळे आपल्या जीवनात मोठे बदल होत आहेत. पूर्वी डिसेंबर महिना आला की डायऱ्या आणि कालदर्शिक (कॅलेंडर) आणणे अनिवार्य असायचे. घरोघरी स्वयंपाकघरात फ्रीजशेजारी भिंतीवर कॅलेंडर विराजमान होत असे. या कॅलेंडरवर अनेक सांसारिक गोष्टी लिहिल्या जात असत. साखर संपली, दूध, वाणसामान भरले, वाढदिवस, विवाहदिवस, दिलेले आहेर, प्रवास तारखा, उपास अशा अनेक गोष्टींची नोंद असे. नंतर त्यात पंचांगही आले. मुहूर्त, दिन विशेष अशा अनेक गोष्टी महिन्याच्या मागील पानावर वा उजवीकडील जागेत लिहिल्या जात असत. महत्त्वाचे सण कधी आहेत, गोरज मुहूर्त कुठले अशी इत्यंभूत माहिती कालदर्शिकेत असे. कॅलेंडर हे मराठी कुटुंबातील एक सदस्य असे. स्वयंपाकघरात त्याची हक्काची जागा असे. माझी आजी जुने कॅलेंडर न काढता त्यावरच नवीन वर्षाचे लावत असे. 'असे का' असे विचारताच 'दूधवाले, कामाच्या बायांशी चर्चा (वाद) करताना मदत मिळते, कारण त्यावर खाडे, कमी जास्त अशा अनेक उपयुक्त गोष्टी लिहिलेल्या असत. अनेकदा मी आजीला रात्री कॅलेंडर्स वाचून कागदावर विशेष नोंदी लिहिताना पहिले. हे तू काय करते आहेस असे विचारता 'तुला कळणार नाही' असे उत्तर मिळायचे. आता गोष्टी वेगाने बदलत आहेत. या सर्व बाबी मोबाईल ॲपवर आहेत. मोबाईलचा आणखी एक फायदा म्हणजे तो सतत तुमच्याजवळ असतो. त्यामुळे तुम्हाला कुठेही माहिती मिळते. आजच्या वेगवान जगात वेळ व्यवस्थापन हे अत्यंत महत्त्वाचे बनले आहे. कॅलेंडर हे वेळेचे नियोजन करण्याचे मुख्य साधन आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता, मशीन लर्निंग, बिग डेटा ॲनालिसिस, रोबोटिक्स या आणि यासारख्या घटकांमुळे संबंधित संगणकीय प्रणाली आणि यंत्रणा स्वतंत्रपणे निर्णय घेणाऱ्या आणि स्वयंभू बनत आहेत. कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्र वेगाने विकसित होत आहे आणि त्याचा कॅलेंडर आणि वेळ व्यवस्थापनावर मोठा परिणाम होत आहे. यामुळे आपले दैनंदिन जीवन, काम आणि सामाजिक नियोजन करण्याच्या पद्धतीत मोठे बदल होत आहेत. त्यासाठी एआय टूल्स कॅलेंडर एआय, गुगल असिस्टंट, क्लॉकवाईज, शेड्युल एआय अशी अनेक लोकप्रिय कॅलेंडर उपलब्ध आहेत. त्याचबरोबर आपले चॅटबॉट्सही मदत करतात. तुमच्या कॅलेंडरमध्ये अपॉइंटमेंट्स आणि मीटिंग्ज हाताने लिहायचे दिवस आता इतिहासजमा झाले. एआय-सक्षम वैयक्तिक सहाय्यक आता सूत्रे हाती घेत आहेत, तुमचे वेळापत्रक व्यवस्थापित करण्याचा ते एक संपूर्ण सखोल दूरगामी मार्ग देतात. नैसर्गिक भाषा प्रक्रिया क्षमतांनी सुसज्ज असलेले हे सहाय्यक वापरकर्त्यांना त्यांच्या कॅलेंडरशी संभाषणात्मक संवाद साधण्याची परवानगी देतात. तुमच्या व्हर्च्युअल सहाय्यकाला तुमच्या आगामी कार्यक्रमांबद्दल फक्त सांगा किंवा तुमच्या दिवसाचा सारांश विचारा आणि ते उर्वरित काम हाताळेल. या तंत्रज्ञानाचा वापर करणारे कॅलेंडर ॲप तुमच्या ऐतिहासिक वेळापत्रकांचे विश्लेषण करू शकतात, कमाल उत्पादकता तास ओळखू शकतात आणि बैठकीच्या सोयीस्कर वेळा सुचवू शकतात. स्थान, उपस्थितांची उपलब्धता आणि निकड यांसारख्या घटकांचा विचार करून एआयचालित वेळापत्रक तुमचे कॅलेंडर तुमच्या अद्वितीय कार्यप्रवाहाशी सुसंगत असल्याचे सुनिश्चित करते. आयुष्य अप्रत्याशित असते आणि योजना अनेकदा बदलतात.

# कंकरवाडी येथे सिकलसेल सप्ताह साजरा



रिसोड : जिल्हा परिषद प्राथमिक कंकरवाडी येथे सिकलसेल आजार निर्मूलन अभियान अंतर्गत जनजागृती व तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले हा आजार अनुवंशिक असून त्यामध्ये घाबरण्याचे कारण नाही असे मत - डॉ रामहरी बेले ,तालुका आरोग्य अधिकारी रिसोड यांनी व्यक्त केले

- सिकलसेल आजार हा अनुवंशिक असून पुढील पिढीला वाचविण्यासाठी व सतर्क करण्याकरिता सिकलसेलची तपासणी करणे अत्यंत गरजेचे आहे तसेच विवाह करण्यापूर्वी सिकलसेल तपासणी करून घ्यायलाच पाहिजेत एखादी नवरी किंवा नवरदेव पीडित किंवा वाहक असेल तर त्यावर काही उपाययोजना भविष्यामध्ये करता येईल त्यांना उपचाराखाली आणता येईल तपासणी केल्यामुळे त्या कुटुंबाचा मानसिक त्रास कमी होईल व पुढच्या पिढीला त्याचा फायदाच होईल असे मत तालुका आरोग्य अधिकारी डॉ रामहरी बेले सर यांनी शिबिरादरम्यान आपले मत व्यक्त केले

तालुक्यामध्ये मां. जिल्हा आरोग्य अधिकारी साहेब डॉ. पांडुरंगजी ठोंबरे, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. विजय दामोदर काळे ,जिल्हा सिकलसेल समन्वयक .इंगोले सर यांच्या मार्गदर्शक सूचनेनुसार सिकलसेल आजार निर्मूलन अभियान अंतर्गत जनजागृती व तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शिबिरामध्ये विद्यार्थ्यांना खालील माहिती देण्यात आली सिकलसेल आजाराची लक्षणे,प्रकार ,सिकलसेल आजारावर करण्यात येणारे उपचार तसेच आजाराबाबत घ्यावयाची काळजी ,आजाराची गंभीरता व औषधोपचार व तपासणी शिबिर घेण्यात आले त्यामध्ये तालुका सिकलसेल सहाय्यक. भारत पारवे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन व माहिती दिली हा आजार आनुवंशिक असून येणाऱ्या पिढीला या आजारा पासून संरक्षण व्हावे यासाठी १ ते ४० वयोगटातील सर्व लाभार्थ्यांनी आपली सिकलसेल तपासणी करून घ्यावी. यावेळी . धांगड आरोग्य सेवक, आरोग्य सेविका आशा स्वयंसेविका उपस्थित होत्या. तसेच जिल्हा परिषद कंकरवाडी येथील विद्यार्थ्यांची सिकलसेल सोल्यूबिलिटी तपासणी करण्यात आली, मुख्याध्यापक तसेच शाळेचे शिक्षक वृंद यांचे मोलाचे सहकार्य लाभले. (वि. प्र)

## दारू दुकानांच्या स्थलांतरासाठी सोसायटीची एनओसी बंधनकारक

### - उपमुख्यमंत्री अजित पवार

नागपूर दि. १० : राज्यात एफ.एलह२ आणि सी.एलह३ परवानाधारक विदेशी व देशी दारू किरकोळ विक्री केंद्रांच्या स्थलांतरासाठी नोंदणीकृत सोसायटीची एनओसी अनिवार्य करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला असल्याची माहिती उपमुख्यमंत्री व उत्पादन शुल्क मंत्री अजित पवार यांनी विधानसभेत दिली. सदस्य शंकर जगताप यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना ते बोलत होते. पवार म्हणाले की, संबंधित दुकान सोसायटी परिसरात असेल तर सोसायटीची संमती नसल्यास स्थलांतरास कोणतीही परवानगी दिली जाणार नाही. एफएलह२ आणि सीएलह३ परवान्यांबाबत ही अट आता काटेकोरपणे लागू राहील.

# वस्त्र उद्योग व हस्तशिल्प विकास शिबीर उत्साहात

रिसोड : स्थानिक अमरदास बाबा सभागृह रिसोड येथे दुपारी १२ ते ४ या वेळात भारत सरकार मार्फत चालवण्यात येणाऱ्या हस्तशिल्प हस्तकला व वस्त्र उद्योग मंत्रालयामार्फत नागपूर येथील कार्यालयाचे प्रभारी श्री दिनेश जी कुमार साहेब यांच्या मार्गदर्शनात शिबिर संपन्न झाले. श्री दिनेश जी साहेब यांनी हस्तकला व वस्त्र उद्योग मंत्रालय नागपूर येथून येवून प्रत्यक्ष वाशिम जिल्ह्याला भेट दिली असता रिसोड येथे सुतार सोनार लोहार कुंभार बुरड तसेच दगडी काम करणारे कारागीर यांना शासकीय योजना व कर्ज पुरवठा, व वैद्यकीय तसेच आपल्या पाल्यांना शैक्षणिक सुविधा याबद्दल माहिती दिली. त्यांनी कार्यक्रमात नवीन कारागीर लोकांचे फॉर्म भरून घेतले व जुन्या नोंदणी करणाऱ्या कारागिरांना आरटीजन कार्ड वितरित केले. या योजनेचा जास्तीत जास्त फायदा तळागाळातील कारागिरांना मिळावा या संदर्भात त्यांनी आवाहन केले.



सदर कार्यक्रमाचे आयोजन अखिल भारतीय विश्वकर्मा महासंघटनेचे जिल्हा अध्यक्ष श्री सूर्यभान इंगळे यांनी केले होते. कार्यक्रमाला अखिल भारतीय विश्वकर्मा संघटनेचे प्रदेश उपाध्यक्ष श्री सुरेश भाऊ गव्हाणकर व संघटक श्री देवव्रत गव्हाणकर हे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री विजयराव खोलगडे हे होते तर सूत्रसंचालन श्री सूर्यभान इंगळे यांनी केले. तसेच आभार प्रदर्शन श्री देवव्रत गव्हाणकर यांनी केले. कार्यक्रमाला बहुसंख्येने रिसोड तथा मालेगाव तालुक्यातील कारागीर उपस्थित होते. श. प्र.

# देशात प्रथमच होणार डिजीटल जनगणना



नवी दिल्लीः केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत २०२७ मध्ये होणाऱ्या जनगणनेसाठी तब्बल ११ हजार ७१८ कोटी रुपयांचे बजेट मंजूर करण्यात आले आहे. विशेष म्हणजे देशात पहिल्यांदाच डिजिटल जनगणना होणार आहे. यासाठी तब्बल ३० लाख कर्मचाऱ्यांना कामाला लावले जाणार आहे. जनगणना पूर्व चाचणीला गगनबावड्यातून प्रारंभ. केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी आजच्या पत्रकार परिषदेत २०२७ मध्ये देशात जनगणना होणार असल्याचे जाहीर केले. ही जनगणना दोन टप्प्यात होणार असल्याचे रेल्वे मंत्री वैष्णव यांनी सांगितले. पहिल्या टप्प्यात हाऊसिंग लिस्ट आणि हाऊसिंग जनगणना होणार आहे. ही जनगणना २०२६ मध्ये एप्रिल ते डिसेंबरपर्यंत पूर्ण केली जाईल. त्यानंतर दुसऱ्या टप्प्यात लोकसंख्येची गणना होणार आहे. ही लोकसंख्या गणना फेब्रुवारी २०२७ मध्ये होईल.

## ११ हजार ७१८ कोटी रुपयांचे बजेट मंजूर

- २०२७ ची जनगणना ही डिजिटल पद्धतीने केली जाईल. मोबाईल ॲप्सद्वारे भरुन घेतली जाईल. हिंदी, इंग्रजी आणि प्रादेशिक भाषांमध्ये माहिती भरुन घेतली जाईल. जनगणना नियंत्रण आणि व्यवस्थापन यंत्रणा पोर्टल तयार केले जाईल. हाऊस लिस्टींग ब्लॉक क्रिएटर वेब मॅप ॲप्लिकेशन तयार केले जाईल. त्याद्वारे जिओ टॅगिंग केले जाणार आहे. डिजिटल ऑपरेशनमध्ये सायबर सुरक्षेची काळजी घेतली जाईल.

**जातही नोंदविली जाणार!**

- २०२७ च्या जनगणनेत जात नोंदवून घेतली जाईल. स्वतः माहिती नोंदवता येणार. २०२७ ची जनगणना पार पडल्यानंतर जनगणनेची माहिती मंत्रालये, राज्य सरकार यांना मागणीवरून दिली जाईल, ती यूजर फ्रेंडली, मशीन रिडेबल फॉरमॅटमध्ये दिली जाईल. जनगणनेसाठी देशभर प्रचार प्रसार केला जाईल. ३० लाख लोक जनगणनेसाठी कार्यरत असतील, त्यातून १.०२ कोटी दिवसांचा रोजगार निर्माण होईल.

**जनगणनेचे महत्त्व**

जनगणनेतून जी माहिती उपलब्ध होईल ती धोरण ठरवण्यासाठी आणि सार्वजनिक प्रशासनासाठी फायदेशीर होईल. लोकसभा, विधानसभा, स्थानिक स्वराज संस्थांच्या मतदारसंघांच्या फेररचनेसाठी आणि आरक्षण निश्चितीसाठी जनगणनेच्या डेटाचा वापर होईल. संशोधकांनादेखील या माहितीचा फायदा होईल.

अश्विनी वैष्णव यांनी जनगणनेचे डिजिटल डिझाईन डेटा सुरक्षा लक्षात घऊन तयार केल्याचे सांगितले. भारताची जनगणना ही देशातील लोकसंख्या, सेन्सस, सामाजिक आर्थिक स्थिती आणि देशातील संसाधनांचे वितरण याचे एक मोठ्या स्तरावर केलेले सर्वेक्षण असते.

भारत सरकारच्या गृह मंत्रालयाच्या अख्त्यारितील रजिस्ट्रार जनरल आणि सेन्सस कमिश्नर यांच्यद्वारे ही मोहीम संचालित केली जाते.

# कृषी विभागाने युरिया खताचे नियोजन करावे - सानप

## रिसोड ,मालेगाव तालुक्यात युरिया खताची टंचाई

**रिसोडः** सध्या रब्बी हंगामात सर्वत्र युरिया खताची मागणी वाढली आहे रब्बी हंगाम लक्षात घेता शेतकऱ्यांना युरिया खत अत्यावश्यक झाले असताना मात्र युरिया खताचा तुटवडा भासत असल्याचे दिसते व त्यामुळे शेतकऱ्यांचे खतासाठी अतोनात हाल होत आहे त्यामुळे युरिया खत विक्री बाबतचे योग्य नियोजन कृषी विभागाने करावे अशी मागणी माजी सभापती कृषी व पशु संवर्धन जिल्हा परिषद विश्वनाथ सानप यांनी केली आहे रिसोड व मालेगाव तालुक्यात शेतकऱ्याकडून युरिया खताचे सार्वत्रिक मागणी वाढत आहे



गव्हा बरोबरच इतर रब्बी पिकासाठी यरिया खत आवश्यक झाले आहे परंतु शेतकऱ्यांना युरिया खत मिळत नाही अशा परिस्थितीत खतासाठी शेतकऱ्यांची कृषी सेवा केंद्र वर भटकंती सुरू झाली आहे तर खतासाठी शेतकरी त्रस्त झाले आहे रब्बी हंगामा करता शेतकऱ्यांना युरिया खताची गरज आहे अशा परिस्थितीत शासनाने युरिया खत हे मुबलक प्रमाणात उपलब्ध करून दिले पाहिजे अशी मागणी शेतकऱ्यांची असताना मात्र दोन्ही तालुक्यात युरिया खताचा तुटवडा जाणवत आहे तर काही कृषी सेवा केंद्रावर युरिया खत विक्रीस आले असता तातडीने या खताची विक्री होत असल्याने अनेक शेतकऱ्यांत मात्र युरिया खत मिळत नसल्याने निराशा पसरत आहे तर अनेकाकडून युरिया खतासाठी जास्तीचे दर घेतल्या जात आहे त्यामुळे शेतकऱ्याचा ही प्रचंड नाराजी पसरली आहे.

सध्या अत्यावश्यक असणाऱ्या युरिया खताची मागणी लक्षात घेता शासनाने युरिया खताचा पुरवठा तातडीने वाढवावा तसेच जिल्हा कृषी विभाग व रिसोड व मालेगाव तालुका कृषी विभागाने सुद्धा याकडे लक्ष देऊन युरिया खताचे योग्य ते नियोजन करावे अशी मागणी माजी सभापती कृषी व पशु संवर्धन जिल्हा परिषद विश्वनाथ सानप यांनी केली आहे. ता. प्र.

पिंगलाक्षी एक्सप्रेस (मराठी साप्ताहिक ) । R.N.I. No. MAHMAR/2008/24720

हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक गजानन श्रीराम बानोरे यांनी दिप प्रिंटर्स (मुद्रक - राम उत्तमराव सालवणकर) वारा जहां. ता.जि.वाशीम येथे छापून कार्यालय, साप्ता. पिंगलाक्षी एक्सप्रेस, सिध्दी विनायक शिक्षक कॉलनी, मु.पो. ता. रिसोड जि. वाशीम (महा.) येथून प्रकाशित केले. (सर्व वाद रिसोड न्यायालया अंतर्गत) प्रकाशित असलेल्या सर्व लेख व वृत्ताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (पी.आर.बी. ॲक्ट नुसार संपादक जबाबदार)

